# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
# पुणे विभागीय मंडळ, पुणे-४११००५.

## *प्रकटन*

क्रमांक पुविमं/खा.वि./4741
पुणे-४११००५.
दिनांक: १०/०८/२०२३

प्रती,
मुख्याध्यापक,
सर्व माध्यमिक शाळा/विद्यालय,
पुणे/अहमदनगर/सोलापूर.

विषय: इ. १० वी मार्च २०२४ परीक्षेसाठी प्रविष्ठ होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांच्या नावनोंदणी अर्जाबाबत.
संदर्भ: जा. क्र.रा.मं./परीक्षा-३/३४६६ दि. ०८/०८/२०२३ रोजीचे पत्र.

या प्रकटनाद्वारे सर्व माध्यमिक शाळा मुख्याध्यापकांना उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की **माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेसाठी खाजगीरित्या प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी यापूर्वी संपर्क केंद्रांमार्फत नाव नोंदणी प्रक्रिया राबविण्यात येत होती. मात्र प्रचलित पद्धतीमधील अडचणींचा, त्रुटींचा विचार करून सदरची योजना जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना लाभदायी, सुलभ व विद्यार्थी केंद्रीत व्हावी या दृष्टीने यापूर्वीची संपर्क केंद्र शाळेमार्फत नाव नोंदणी अर्ज स्विकारण्याची प्रचलित पद्धत बंद करून इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांचे ज्या पद्धतीने सर्व कनिष्ठ महाविद्यालयातून नाव नोंदणी अर्ज स्विकारण्यात येतात त्याप्रमाणेच माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी ) परीक्षेच्या खाजगी विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी अर्ज सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळांमधून स्विकारण्याची कार्यपद्धती मार्च २०२४ च्या परीक्षेपासून सुरू करण्यात येत आहे.**

तरी सर्व माध्यमिक शाळांनी याची नोंद घेऊन शिक्षण प्रवाहाच्या बाहेर राहिलेल्या परंतु किमान इ. ५ वी उत्तीर्ण असलेल्या मुला-मुलींना माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेस बसवून शिक्षणाच्या प्रवाहात येण्याची संधी उपलब्ध करून द्यावी. यासंदर्भातील सर्व माहिती व मार्गदर्शक पुस्तिका मंडळाच्या संकेत स्थळावर **http://mahahsscboard.in** प्रसिद्ध करण्यात येत आहे. तसेच अधिक माहितीसाठी सर्व माध्यमिक शाळांनी या विभागीय मंडळाशी संपर्क साधावा.

त्यानुसार मार्च २०२४ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी ) परीक्षेसाठी खाजगीरित्या (फॉर्म नं. १७) प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नावनोंदणी अर्ज (फॉर्म नं. १७) ऑनलाईन प्रक्रियेद्वारे भरून घेण्यात येणार असून त्यासाठी खाली नमूद केलेल्या सुचनांनुसार सर्व मुख्याध्यापकांनी कार्यवाही करावयाची आहे.

इ. १० वी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र. | तपशील | इ. १० वी नाव नोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्यासाठी तारखा |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरणे. | सोमवार दि. १४ ऑगस्ट २०२३ ते सोमवार दि. ११ सप्टेंबर २०२३ |

| | | |
|---|---|---|
| २ | विद्यार्थ्यांनी मूळ अर्ज, ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीच्या दोन छायाप्रती व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या माध्यमिक शाळेत जमा करणे. | गुरुवार दि. १७ ऑगस्ट २०२३<br>ते<br>सोमवार दि. १३ सप्टेंबर २०२३ |
| ३ | माध्यमिक शाळांनी विद्यार्थ्यांचे अर्ज, ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीची एक छायाप्रत, मूळ कागदपत्रे व यादी विभागीय मंडळाकडे जमा करणे. विद्यार्थ्यांना मंडळाकडे पाठवू नये. | शुक्रवार दि. १५ सप्टेंबर २०२३ |

१) खाजगी विद्यार्थ्यांनी इ. १० वी साठी नाव नोंदणी अर्ज ऑनलाईन पद्धतीनेच शाळा प्रमुखांशी संपर्क साधून भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन अर्ज स्वीकारला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

२) विद्यार्थ्यांनी/ शाळा प्रमुखांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी खालील वेबसाईटचा वापर करावा. अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर मराठी/इंग्रजी मधून उपलब्ध आहेत त्या वाचून अर्ज भरण्यास सुरुवात करावी. **संकेतस्थळ: http://form17.mh-ssc.ac.in**

३) विद्यार्थ्याने अर्ज भरण्याकरिता १) शाळा सोडल्याचा मूळ दाखला (मुळप्रत), नसल्यास द्वितीय प्रत व प्रतिज्ञापत्र २) आधारकार्ड ३) स्वतःचा पासपोर्ट आकारातील फोटो स्वतःजवळ ठेवावा. ऑनलाईन अर्ज भरताना सदर कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करावयाची आहेत.

४) विद्यार्थी किमान पाचवी उत्तीर्ण असावा.

५) राज्य मंडळाच्या इ. १० वी परीक्षेचा अनुत्तीर्ण विद्यार्थी खाजगी विद्यार्थी नाव नोंदणीसाठी पात्र नाही.

६) शाळा सोडल्याचा दिनांक व दाखला दिल्याचा दिनांक याबाबत पात्रतेसाठी शाळा सोडल्याचा दिनांक ग्राह्य धरावा. दि. ३० जून २०२३ पूर्वी विद्यार्थ्याचा शाळा सोडल्याचा दाखला असणे आवश्यक आहे व विद्यार्थ्याचे वय दि. ३१/०७/२०२३ रोजी किमान १४ वर्ष पूर्ण असावे.

७) कागदपत्रे स्कॅन करण्यासाठी स्कॅनर/मोबाईल द्वारे कागदपत्रांचे फोटो काढून ते अपलोड करावेत. विद्यार्थ्यांचा मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी पुढील संपर्कासाठी अनिवार्य आहे.

८) संपूर्ण अर्ज भरून झाल्यावर भरलेल्या अर्जाची प्रत विद्यार्थ्याला त्याने अर्जात नमूद केलेल्या ई-मेलवर पाठविली जाणार आहे. तसेच या संपूर्ण भरलेल्या अर्जाची प्रिंटआऊट, शुल्क पावती व हमीपत्र यासह दोन प्रतीत काढून घ्यावी.

९) विद्यार्थ्यांनी अर्ज, ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोच पावतीच्या दोन छायाप्रती व मूळ कागदपत्रे नाव नोंदणी अर्जावर नमूद केलेल्या माध्यमिक शाळेत विहीत मुदतीत जमा करावयाची आहे.

१०) खाजगी विद्यार्थ्यांसाठी नाव नोंदणी शुल्काचा तपशील खालीलप्रमाणे:-

**इ. १० वी – रु. १०००/- नोंदणी शुल्क + रु. १००/- प्रक्रिया शुल्क (Processing fee)**

११) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी ) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांच्या पत्यानुसार व त्याने निवडलेल्या माध्यम निहाय त्यास माध्यमिक शाळांची यादी दिसेल त्यामधील एका माध्यमिक शाळेची निवड विद्यार्थ्याने करावयाची आहे. व त्याप्रमाणे संबंधित शाळेशी संपर्क साधावा. या माध्यमिक शाळेने परीक्षा अर्ज, प्रकल्प अंतर्गत मूल्यमापन, प्रात्यक्षिक/तोंडी, श्रेणी विषय संदर्भातील कामकाज व अनुषंगिक मूल्यमापन करावयाचे आहे.

१२) इ. १० वी मार्च २०२४ खाजगी विद्यार्थी फॉर्म नंबर १७ ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क ऑनलाईन पद्धतीने (Debit Card/Credit Card/UPI/Net Banking द्वारे) भरणे अनिवार्य राहिल ऑनलाईन पद्धतीने शुल्क जमा केल्यानंतर विद्यार्थ्याला पोचपावती प्राप्त होईल. सदर पोचपावती स्वतः जवळ ठेवून त्याच्या दोन छायाप्रती माध्यमिक शाळेसदेण्यात याव्यात. तसेच एकदा नाव नोंदणी अर्ज सादर केल्यानंतर कोणत्याही कारणास्तव नाव नोंदणी शुल्क विद्यार्थ्याला परत केले जाणार नाही. तसेच नाव नोंदणी अर्जात दुरुस्ती

करावयाची (उदा. माध्यम, शाळा अथवा अन्य कारणास्तव) असल्यास विद्यार्थ्यास पुन:श्च नाव नोंदणी शुल्क जमा करावे लागेल याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

१३) दिव्यांग विद्यार्थ्यांना खाजगिरित्या प्रविष्ठ व्हावयाचे असेल तर त्यांनी त्यांच्या दिव्यांगत्वाचे जिल्हा शल्य चिकित्सकांच्या/प्राधिकृत केलेल्या हॉस्पिटलच्या प्रमाणपत्राची छायाप्रत प्रमाणित करून अर्जासोबत सादर करावी व आवश्यकतेनुसार विभागीय मंडळ/माध्यमिक शाळा यांचेकडून माहिती प्राप्त करून घ्यावी.

१४) ऑनलाईन अर्ज भरताना कोणतीही अडचण आल्यास कार्यालयीन वेळेत दूरध्वनी क्र. ०२०-२५७०५२०७/ २५७०५२०८/२५७०५२७१ वर संपर्क साधावा.

१५) विद्यार्थ्यांना नाव नोंदणी प्रमाणपत्र ऑनलाईन देण्यात येणार आहे याची नोंद घ्यावी तसेच विद्यार्थ्यांनी अर्जासोबत छाननीसाठी दिलेली मूळ कागदपत्रे माध्यमिक शाळेत निर्धारित कालावधीनंतर परत घेऊन जाण्याची दक्षता घ्यावी.

१६) पात्र विद्यार्थ्यांना नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे (examination form) मंडळाने विहित केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह भरणे आवश्यक आहे याची नोंद विद्यार्थ्यांनी घ्यावी.

१७) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०२४ पासून खाजगी विद्यार्थी संपर्क केंद्र पद्धत बंद करून सर्व माध्यमिक शाळांमार्फतच खाजगी विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी अर्ज स्विकारण्यात येणार असल्याने सर्व शाळांनी खाजगी विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी अर्ज स्विकारावे. आपण सदर अर्ज न स्विकारल्यास व विद्यार्थ्यांना योग्य ते सहकार्य न केल्यास आपल्या शाळेवर मंडळाच्या नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(औदुंबर उकिरडे)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे-४११००५.

प्रत माहीतीस्तव:
१) मा. सचिव, राज्य मंडळ , पुणे-०४.
प्रत माहितीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव:
१) शिक्षणाधिकारी (माध्य.): पुणे/अहमदनगर/सोलापूर
आपल्या कार्यकक्षेतील सर्व शाळांना उपरोक्त प्रकटन निदर्शनास आणून द्यावे.